# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिके करीता केंद्र पुरस्कृत शासनाचे अमृत-२.० योजने अंतर्गत नागपूर शहरातील साऊथ सिवरेज झोन व हुडकेश्वर आणि नरसाळा करीता सांडपाणी संकलन प्रणालीचा विकास करणे व प्रक्रिया बाबतचा रु. १०३०/- कोटीचा विस्तृत (पोहरा नदी) प्रकल्पाचा (Pollution Abatement of Pohra River) समावेश करण्यात आलेला आहे. केंद्र पुरस्कृत अमृत- २.० अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय क्र. अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवी-३३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १४ जुलै २०२२ अन्वये निर्णयात नमूद केल्यानुसार केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) रु. २५७.५० कोटी, राज्याशासन अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) रु. २५७.५० कोटी महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे आणि नागपूर महानगरपालिकेच्या हिस्सा (प्रकल्प किंमतीच्या ५०%) रु. ५१५.०० कोटी आहे. उपरोक्त नमूद विस्तृत प्रकल्प अहवाल (Pollution Abatement of Pohra River) नियुक्त सल्लागार M/s. DRA Consultants Pvt. Ltd., Nagpur यांच्याव्दारे तयार करुन तांत्रिक मंजुरीस्तव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर यांना पाठविण्यात आलेला आहे. करीता उपरोक्त प्रकल्पास लागणारी मनपाच्या हिस्स्याची (५०%) रक्कमेची तरतूद करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**{सार्व.आरो.अभि. विभाग}**

टिप :- विस्तृत माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 328/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 27/03/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिके करीता केंद्र पुरस्कृत शासनाचे अमृत-२.० योजने अंतर्गत नागपूर शहरातील साऊथ सिवरेज झोन व हुडकेश्वर आणि नरसाळा करीता सांडपाणी संकलन प्रणालीचा विकास करणे व प्रक्रिया बाबतचा रु. १०३०/- कोटीचा विस्तृत (पोहरा नदी) प्रकल्पाचा (Pollution Abatement of Pohra River) समावेश करण्यात आलेला आहे. केंद्र पुरस्कृत अमृत- २.० अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय क्र. अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवी-३३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १४ जुलै २०२२ अन्वये निर्णयात नमूद केल्यानुसार केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) रु. २५७.५० कोटी, राज्याशासन अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) रु. २५७.५० कोटी महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे आणि नागपूर महानगरपालिकेच्या हिस्सा (प्रकल्प किंमतीच्या ५०%) रु. ५१५.०० कोटी आहे. उपरोक्त नमूद विस्तृत प्रकल्प अहवाल (Pollution Abatement of Pohra River) नियुक्त सल्लागार M/s. DRA Consultants Pvt. Ltd., Nagpur यांच्याव्दारे तयार करुन तांत्रिक मंजुरीस्तव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर यांना पाठविण्यात आलेला आहे. करीता उपरोक्त प्रकल्पास लागणारी मनपाच्या हिस्स्याची (५०%) रक्कमेची तरतूद करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**